# महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्या.
# मेस्को करिअर अॅकॅडमी,सातारा
# (महाराष्ट्र शासन अंगीकृत)

## अॅकॅडमी बद्दलची माहिती

1. सैन्य आणि पोलीस दलांमध्ये भरती होणे हेच ध्येय ठरवून त्यासाठी पडेल ते शारीरीक आणि बौद्धीक कष्ट करण्याची तयारी असणाऱ्या युवकांना त्यांची शारीरिक व शैक्षणिक पात्रता तपासून अधिकृतपणे मार्गदर्शन करण्याची नितांत गरज आहे.त्याची पुर्तता व्हावी आणि या क्षेत्रात कार्य करीत असलेल्या अनाधिकृत प्रशिक्षण संस्था व एजंटांकडून फसवणूक होऊ नये यासाठी टी.सी.पी.सी आवार ,करंजे नाका ,सातारा येथे “मेस्को करिअर अॅकॅडमी” या नावाने सैन्य आणि पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र दिनांक ०१ सप्टेंबर २००३ पासून सूरु करण्यात आले आहे.

2. **<u>प्रशिक्षण-</u>** या प्रशिक्षण केंद्रात वर्षभर प्रशिक्षण चालू असते.प्रशिक्षणात उमेदवारांची लेखी आणि मैदानी परिक्षांची परिपूर्ण तयारी करून घेतली जाते.यासाठी दररोज सकाळी सहा ते रात्री दहा वाजेपर्यंत वेळापत्रकाप्रमाणे प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येतो.

3. **<u>प्रशिक्षण साधन सामुग्री-</u>** प्रशिक्षण केंद्रात स्वत:चे विशाल प्रशिक्षण मैदान ,पंधरा फुट रुंदीचा व चारशे मीटर लांबीचा प्रशस्त रनिंग ट्रॅक ,लांब उडी ,उंच उडी ,गोळा फेक ,नऊ फुट डिच ,झिग झॅग बॅलंस ,डबल बार ,पुल अप्स साठी सिंगल बार ,व्हर्टिकल रोप ,मंकी रोप आणि इतर ऑब्स्टॅकल.

4. **<u>वाचनालय सुविधा-</u>** प्रशिक्षण केंद्रात सुसज्ज वाचनालय असून सूरक्षा दलातील सर्व प्रकारच्या पदांसाठी आवश्यक असलेली पूस्तके या ठिकाणी उपलब्ध् आहेत.

5. **<u>प्रशिक्षक वर्ग-</u>** प्रशिक्षक केंद्रात शारीरिक प्रशिक्षणासाठी म्हणजे मैदानी परिक्षेच्या तयारीसाठी सैन्य दलातून निवृत्त झालेल्या कुशल अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन आणि लेखी परिक्षेच्या तयारीसाठी महाविद्यालयातील अनूभवी प्राध्यापक वर्गाचे मार्गदर्शन उपलब्ध आहे.त्याचबरोबर सर्व प्रकारच्या सूरक्षा दलातील स्पर्धा परिक्षांसाठी मागील प्रश्नपत्रिकांवर आधारित प्रश्न संच आहेत.त्यामूळे केंद्रात घेतल्या जाणाऱ्या लेखी आणि मैदानी परिक्षांच्या प्रशिक्षणात कसल्याही प्रकारची त्रूटी रहात नाही.

**<u>अतिरिक्त सुविधा-</u>**

**6. <u>प्रशिक्षणार्थींच्या राहाण्याची व भोजनाची व्यवस्था</u>-** अॅकॅडमीमध्ये ९४ प्रशिक्षणार्थींच्या निवासासाठी सर्व सोईंनीयूकत मोठी इमारत असून प्रत्येक प्रशिक्षणार्थीला कॉट ,सतरंजी ,गादी ,बेडशिट ,चादर ,व मच्छरदाणी दिली जाते.त्याचबरोबर वैयक्तिक सामान ठेवण्यासाठी प्रत्येकास स्वतंत्र लॉकरची सोय उपलब्ध आहे.भोजन व्यवस्थेसाठी मेस सूविधा असून प्रशिक्षणार्थी साठी खूल्या मार्केट मधून उत्कृष्ट अन्नधान्य व इतर वस्तूंची खरेदी केली जाते.अॅकॅडमीमध्ये जवळ जवळ अर्धा एकर जमिनीमध्ये किचन

गार्डन तयार केले असून त्यात सर्व प्रकारच्या भाजी –पाल्याची लागवड केली आहे.त्यातून दररोज ताजा भाजीपाला उपलब्ध होत.असतो.भोजन बनविण्यासाठी तीन सक्षम महिला कर्मचारी नियुक्त केलेल्या असून प्रशिक्षणार्थीसाठी भोजनामध्ये विविध प्रकारचे भोजन म्हणजे नाष्टा व दूध ,दूपारचे भोजन .सायंकाळचा चहा आणि रात्रीचे भोजन उत्तम प्रकारे व पर्याप्त मात्रेत तयार केले जाते.

7. प्रशिक्षण केंद्रात स्वत:च्या संगणक यंत्रणेद्वारे अर्ध सैन्यबल (Para Military Forces) व पोलीस दलातील भरतीसाठी ऑन-लाईन फॉर्म भरण्याची सुविधा उपलब्ध आहे.

8. मेस्को करिअर अॅकॅडमी मधे सूरक्षा रक्षकाचे (Security Guard) सुद्धा प्रशिक्षण दिले जाते.

9. कल्याणकारी निधीमधून यूद्धविधवा /विधवा/ माजी सैनिक /अवलंबित पाल्यांना आर्थिक मदत:- २५ मार्च २०१५ नंतर मेस्को करिअर अॅकॅडमी ,सातारा येथे भरतीपूर्व प्रशिक्षण किवा सूरक्षा रक्षक कोर्स करणाऱ्या यूद्धविधवा /विधवा/माजी सैनिक/अवलंबित पाल्यांना कोर्स संपल्यावर कोर्स सर्टिफिकेट व फी जमा केल्याची पावती दाखविल्यास प्रशिक्षण शुल्कांच्या ५०% अथवा जास्तीत जास्त रु.२०००/-आर्थिक मदत जिल्हा सैनिक कार्यालयामार्फत मिळते.

10. प्रशिक्षण केंद्रात प्रवेशासाठी येताना सोबत वैद्यकीय प्रमाणपत्र असावे ते खालील प्रमाणे :-

**वैद्यकीय प्रमाणपत्र**

नांव

गांव……………………………………………………..तालूका…………………………………

……………………. जिल्हा…………………………………………..हा विद्यार्थी मेस्को करिअर अॅकॅडमी, सातारा येथील शारीरिक प्रशिक्षणासाठी वैद्यकीय दृष्ट्या सक्षम आहे.

दिनांक : डॉक्टरांची सही

१२ अधिक माहितीसाठी मोबाईल क्रमांक ९१६८९८६८६४ व ८९५६०६९०५६ वर कृपया संपर्क साधावा.

## अॅकॅडमीचा पत्ता ,प्रशिक्षक वर्ग व दूरध्वनी क्रमांक

| | | |
|---|---|---|
| १.अॅकॅडमी नांव व पत्ता | : | मेस्को करिअर अॅकॅडमी<br>टी.सी.पी.सी .आवार,<br>करंजे नाका,सातारा. ४१५ ००२ |
| २.अॅकॅडमी दूरध्वनी क्रमांक | : | ९१६८९८६८६४/८९५६०६९०५६/९४२०६९७८०७ |
| ३.कमांडंटचे नांव व मोबाईल क्रमांक | : | कर्नल राजकुमार एस जाधव.(नि)<br>९४२०६९७८०७ |
| ४.प्रशिक्षकांचे नांव व मोबाईल | : | हवा.जमखिंडिवाले आबू (नि) मो.८८८८९८२४२०<br>हवा.रविंद्र मारुती गायकवाड.(नि)<br>मो.९१६८९८६८६४<br>नाईक भोसले संग्राम (नि) मो.९४०४४७४३१७<br>हवा.जाधव किर्तीवान (न) मो. ९४२१००९५९४<br>हवा.शिंदे सचिन (नि) मो.८२०८३३१६८१<br>हवा.प्रदिप थोरात (नि) मो. ९३५९३८२६०२<br>कु.सरिता जाधव<br>सौ.पोतदार ज्योत्स्ना प्रशांत. |

# मेस्को करिअर अकादमीचे कर्मचारी - सातारा

| | |
|---|---|
|  कर्नल राजकुमार एस जाधव (नि.) | या व्यक्तीने भारतीय सैन्यात 32 वर्षे तोफखाना कॉर्प्समध्ये सेवा दिली आहे. ते 07 ऑक्टोबर 2020 पासून कमांडंट मेस्को करिअर ॲकॅडमी, सातारा येथे कार्यरत आहेत. |
|  माजी हवालदार अबुसाब हाजीसाब जमखिंडीवाले | या व्यक्तीने भारतीय सैन्यात 22 वर्षे लिपिक म्हणून काम केले आहे आणि सध्या ते एमसीए सातारा येथे जुलै 2014 पासून Adm NCO म्हणून कार्यरत आहेत. |
|  माजी हवालदार गायकवाड आर.एम | व्यक्तीने भारतीय सैन्यात 17 वर्षे आणि 03 महिने लिपिक म्हणून काम केले आहे आणि सध्या एमसीए सातारा येथे जून 2015 पासून लिपिक म्हणून सेवा करत आहे. |

| | |
|---|---|
| <br>माजी एनके संग्राम भोसले | या व्यक्तीने भारतीय सैन्यात 20 वर्षे आणि 06 महिने टेक्निकल इलेक्ट्रॉनिक्स रेडिओ कम्युनिकेशन म्हणून काम केले आहे आणि सध्या ते एमसीए सातारा येथे ऑगस्ट 2016 पासून शारीरिक प्रशिक्षण प्रशिक्षक म्हणून कार्यरत आहेत. |
| <br>माजी एचसी कीर्तिवान जाधव | या व्यक्तीने केंद्रीय राखीव पोलीस दलात 22 वर्षे केंद्रीय सशस्त्र पोलीस दलात सेवा बजावली आहे. त्यांना शारीरिक प्रशिक्षणाचा मोठा अनुभव आहे आणि ते 2017 पासून एमसीए सातारा येथे शारीरिक प्रशिक्षण प्रशिक्षक म्हणून कार्यरत आहेत. |
| <br>माजी एच सी शिंदे सचिन लक्ष्मण | व्यक्तीने केंद्रीय सशस्त्र पोलीस दलात 22 वर्षे केंद्रीय पोलीस दलात सेवा दिली आहे. त्यांना शारीरिक प्रशिक्षणाचा मोठा अनुभव आहे आणि ते CRPF प्रशिक्षण केंद्र लातूर येथे प्रशिक्षक होते. ऑक्टोबर २०१७ पासून ते सध्या एमसीए सातारा येथे फिजिकल ट्रेनिंग इंस्ट्रिक्टर म्हणून कार्यरत आहेत. |
| <br>माजी हवालदार प्रदिप थोरात | व्यक्तीने भारतीय सैन्यात 22 वर्षे GD सोल्जर म्हणून सेवा केली आहे आणि सध्या 1 जानेवारी 2022 पासून शारीरिक प्रशिक्षण प्रशिक्षक म्हणून MCA सातारा येथे सेवा देत आहे. |

<u>**आमचा आदरणीय प्रशिक्षक वर्ग**</u>

| | |
|---|---|
|  | **कु. सरिता मनोहर जाधव**<br>बी.ई. इलेक्ट्रॉनिक्स |
|  | **सौ. पोतदार ज्योत्सना प्रशांत**<br>एम.एस.सि (फिजिक्स), बी. एड |